(Marathi)

1038
9191

1351 25 P

आवृत्ति २ री.

अभिनवभारतमाला १.



# सिंहगडचा पोवाडा.

' विनायक.

प्रकाशक—फाटक ब्रदर्स, ठाकुरद्वार—मुंबई

R.I. 7651/11 in
Ca 870/12
1351 Mar

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No. 1351
Date 12.1.72
GOVT. OF INDIA

संस्कृत, प्राकृत ग्रंथ, नाटकें कादंबऱ्या, प्रहसनें, शालोपयोगीं पुस्तकें, नकाशे वगैरे सर्व प्रकारचीं पुस्तकें आह्मांकडे मिळतात. आर्डर आल्यास वेळच्या वेळीं काळजीपूर्वक रवाना करूं. व्ही. पी. नें पाठवूं.

**फाटक ब्रदर्स**, बुकसेलर्स,

ठाकुरद्वार—मुंबई.

## हीं पुस्तकें आह्मांकडे विकत मिळतील.

| | |
|---|---|
| संगीत शाकुंतल. .... .... .... | ० १२ |
| ,, रामराज्यवियोग पूर्वार्ध. .... | ० १२ |
| ,, ,, उत्तरार्ध. .... | ० ६ |
| ,, मृच्छकटिक. .... .... .... | ० १२ |
| ,, शारदा. .... .... .... | १ |
| ,, कादंबरी. .... .... .... | ० १२ |
| ,, शापसंभ्रम. .... .... .... | १ |
| ,, संतापशमन. .... .... .... | ० १२ |
| ,, शारदामंडन. .... .... .... | ० ८ |
| तरुणीशिक्षकनाटिका. .... .... | ० १२ |
| मुद्राराक्षस. .... .... .... .... | ० १२ |
| रामदास नाटक. .... .... .... | ० ८ |
| तुकाराम नाटक. .... .... .... | ० १२ |
| ज्ञानेश्वर नाटक. .... .... .... | १ |
| एकनाथ नाटक. .... .... .... | १ |
| वंगजागृति. .... .... .... .... | ० ४ |

| | |
|---|---|
| रावबहादुर पर्वत्या. .... .... .... | ८६ |
| जपानी शिक्षक. .... .... .... | ८१२ |
| जपानी भाषा. .... .... .... | ८१२ |
| स्वदेशी चळवळ. .... .... .... | ८२ |
| नरवीर मालुसरे. .... .... .... | ८१० |
| पानपतचा मोबदला. .... .... .... | ८१२ |
| गुणोत्कर्ष. .... .... .... .... | ८८ |

हीं व याशिवाय इतर सर्व नाटकें, कादंबऱ्या, संस्कृत प्राकृत ग्रंथ, निबंध, शालोपयोगीं पुस्तकें, नकाशे वगैरे सर्व प्रकारचीं पुस्तकें आह्मांकडे मिळतात. व्ही. पी. नें पाठवूं. किंमतीशिवाय ट. ख. निराळा. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन देऊं.

**फाटक ब्रदर्स, बुकसेलर्स,**
**ठाकुरद्वार, मुंबई.**

---

कर्नाटक प्रेस, मुंबई.

Avinavaratnamala
Abhinava Bharatmala

श्री.

1 copy in Marathi
Govt. of Bombay

# सिंहगडचा पोवाडा.

Sinhgadcha Powada.

धन्य शिवाजी तो रणगाजी धन्यचि तानाजी ॥
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गा जी ॥ ध्रु० ॥
देशामाजी कहर गुजरला पारतंत्र्यजहरें ॥
हलाहलहि ह्या परदास्याहुनि गळा गांठतां बरें ॥ १ ॥
गोमातांची मान आणि ती शिखा ब्राह्मणांची ॥
परदास्याची सुरी बंधुहो चिरी एकदांची ॥ २ ॥
देश हिंदुचा हाय ! तयाचा मालक म्लेंच्छ ठरे ! ॥
परि परमेशा फार दिवस हें रुचेल केंवि बरें ? ॥ ३ ॥

**चाल** ॥ मग आर्य देशतारणा । अधममारणा । कराया रणा ।
परदास्यरात्रिनाशाला । शिवनेरीं श्रीमान् आला ।
स्वातंत्र्यसूर्य उदयाला । त्या सूर्याचा किरण रणांगणिं
तळपे तानाजी ॥ प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा
गा जी ॥ध्रु०॥

## २

ठायीं ठायीं वीर मावळा सरसावुनि भाला ॥
रामदाससमतछत्रपतीचा अनुयायी झाला ॥
स्वातंत्र्यश्रीतोरण तोरणागड अवघड पडला ॥
भगवा झेंडा त्या भाल्यासह सरसर वरि चढला ॥
प्रतापगडची शांत कराया स्वतंत्रतादेवी ॥
पुढतीं फाडुनि अफजुल्ल्याला भग तो मग ठेवी ॥
**चाल** ॥ ते धन्य मराठे गडी, । घेति रणिं उडी, ।
करुनि तांतडी ।
देशार्थ मृत्युहि वरिला । षाइस्ता चरचर चिरिला ।
गनिमानि वचक बहु धरिला । झुरती परि रिपु अजुनि
नांदतो सिंहगडा माजी ॥ प्रेमें आजी० ॥ २ ॥

## ३

जरा ढिलाइ पाहुनि वदली जिजा शिवाजीला ।
गड सर केल्याविण वरणें ना अन्न शपथ तुजला ॥ १ ॥
परके बाला भूमातेला ते लाता देतां ।
अन्न न गमतें गोमांसाचा घांसाचि तो घेतां ॥ २ ॥

गुलामगिरिची बेडी पायीं तशीच धरितांना ॥
गुलामगिरिच्या नरकामाजीं तसेच पचतांना ॥ ३ ॥

**चाल** ॥ निर्जीव अन्न कां रुचे । उदर शत्रुचें । फाड, तेथिचें ।
अतड्यांनीं भूक शमवावी । रक्तानि भूक शमवावी ।
मांसांनि भूक शमवावी । ध्या गड कडकड चावुनि
अधरां धांवा ये काजीं ॥ प्रेमें आजी० ॥ ३ ॥

**४**

धन्या माता जिजा, तिलाची शिवबा सुत साजे ॥
स्वतंत्र झाल्यावीण सुताला अन्नहि दे ना जे ॥ १ ॥
स्वातंत्र्याच्या सुखनीमाजी जन्म स्वतंत्रांचे ॥
गुलामगिरीच्या उकीरड्यावरी गुलाम निपजाचे ॥ २ ॥
श्वानहि भरितें पोट बापुडें चघळुनियां तुकडे ।
शेणामाजीं बांधुनि वाडे नांदति शेणकिडे ॥ ३ ॥

**चाल** ॥ संसार तसा जरि करी ॥ मनुजता तरी । कशासी धरी ।
हो तुच्छ किडाचि न कां तो । जो गुलाम असुनी हंसतो ।
परदास्यीं स्वस्थचि बसतो । धिक् धिक् वदला श्रीशिव
घेउनि गड राखूं बाजी । प्रेमें आजी० ॥ ४ ॥

५

प्रभात झाली वाद्यें झडलीं मुहूर्त लग्नाचा ॥
बोहल्यावरी उभा राहिला सुत तानाजीचा ॥ १ ॥
घटिकापात्रें मोजुनि द्विजगण शेवटल्या घडिला ॥
दंगल मोडुनि मंगल व्हाया 'सावधान' वदला ॥ २ ॥
वदला द्विज परि कुणि भेटाया तानाजिसि आला ॥
आला तो तों तरवारींनीं मंडप खणखणला ॥ ३ ॥
**चाल** ॥ तों 'हरहर' एकचि झाला । चमकला भाला ।
वदति रे चला ।
शिवराजदूत पातले । हें लग्न राहु द्या भलें ।
देशार्थ जनन आपलें । लहान मोठा निघे मराठा ।
पुढतीं तानाजी ॥ प्रेमें आजी० ॥ ५ ॥

६

परमात्म्याशीं जीवात्म्याची तन्मयता झाली ॥
वायुकुमर कीं रघुवरचरणीं मिठी पुन्हा घाली ॥ १ ॥
अरुणचि कीं श्रीजगन्मित्रवर सूर्या आलिंगी ॥
आलिंगी कीं तानाजी श्रीशिवराया लागीं ॥ २ ॥

भेट जाहली मसलत बसली 'राया धाडि मला ॥
प्राणहि देइन घेइन गड परि तानाजी वदला ॥ ३ ॥
चाल ॥ हें पर्व स्वातंत्र्याचें । शत्रुरुधिराचें ।
स्नान मज साचें ।
घडुं द्यावें हो शिवराया । देशार्थ पडों द्या काया ।
जाईल ना तरी वायां' । अखेर निसटे शिवहस्तांतुनि
तीरची तानाजी । प्रेमें आजी० ॥ ६ ॥

७

शिवरायाच्या तीरा जा बा तानाजी वीरा ! ॥
वीरांमाजी हो रणगाजी अरि मुर्दानि धीरा ॥ १ ॥
सिंहगडावरि तुझी आर्यभू फोडी हंबरडे ॥
गुलामगिरिचा खून पाडण्या जा जा जा तिकडे ॥ २ ॥
देवदूतहो, स्वातंत्र्याच्या पवित्र कामाला ॥
जातो आहे आमुचा तान्हा रक्षण व्हा त्याला ॥ ३ ॥
चाल ॥ हे मंगल तारागण हो । अप्सरो जनहो ।
गडावरि जाहो ।
तानाजि लढाया येतो । अरि फार एकला कीं तो ।
परि धीर पुढेंची घुसतो । त्या धीरावरि वर्षा
अमृत आणि फुलें ताजीं ॥ प्रेमें आजी० ॥ ॥

८

मध्यरात्रीची वेळ शांत परि भयदायी घोर ॥
गडाखालच्या गर्द झाडिमाधिं घन अंध:कार ॥ १ ॥
रात्रीलाही निद्रा लागे किर्र शब्द नुमटे ॥
करवंदीच्या एका जाळींत तो ध्वनि खोल उठे ॥ २ ॥
"अहो मारिती पूर्वज तुमचे स्वर्गातुनि हांका ॥
"अहो मराठे सर्व देउनी कान नीट ऐका ॥ ३ ॥
"आई तुमची ही भूमाता पाठीवरि तीच्या ॥
"उडतो चाबुक फुटल्याना रे धारा रक्ताच्या ॥ ४ ॥
"त्या रक्ताच्या एका थेंबासाठीं लक्ष शिरा ॥
"रिपुच्या कुटुनी मलम लावणें आईच्या शरिरां ॥५॥
"अस्सल जो जो बीज मराठा तोची मज व्हावा ॥
"त्यानें येउनि देउनि प्राणा मजसह गड घ्यावा ॥६॥
**चाल** ॥ "बाकिचे षंढ हो पळा । गृहाप्रति वळा ।
बचावुनि गळा ।
"गळसरी त्यांत घालणें । तें योग्य तयांला लेणें ।
तरवार करीं ना घेणें" । हरहर गर्जुनि सिंह जाळिंतुनि
चवताळुनि ये जी ॥ प्रेमें आजी० ॥ ८ ॥

९

रामा लक्ष्मण किंवा भीमा अर्जुन जो गमला ॥
अपुल्या भावा सूर्याजीला तानाजी वदला ॥ १ ॥
'कल्याणाच्या दरवाज्याच्या बाजुसि तुह्मिं दबणें ॥
शंभर घेउनि गडी दार मी फोडिन लातेनें ॥ २ ॥
शंकित कां हो हस्त मस्तकें लढतां जरि पडती ॥
धडें तथापी दार फोडितिल पार आमुची तीं ॥ ३ ॥
**चाल**॥ हें काम आमुचें ठरे। बाकि जें उरे। तें करा पुरें!
किल्ल्यांत घुसुनी ते खानी। आजि तुह्मि मर्द मराठ्यांनीं।
हा निघा चाललों हा मी'। 'जा; परि येशिल परत
भेटण्या केव्हां तानाजी'! ॥ प्रेमें आजी० ॥ ९ ॥

१०

दरड उभट बहु चढणें मुष्किल घोरपडीलाही ॥
ह्मणुनि पहारा जिथें गडावर मुळिं नव्हता कांहीं ॥ १ ॥
साधुनि संधी ही तानाजी तिथें नीट आला ॥
सज्ज चढाया-नव्हे-हवेमधिं उडण्याला झाला ॥ २ ॥
कुणि गुणगुणला "पाय घसरतां अहा काय होई"! ॥
वदे शूर "देशार्थ मरोनी स्वर्गा तरि जाई" !!! ॥३॥

**चाल** ॥ यशवंतीं सरसर चढतां । हर्ष हो चित्ता ।
सोल घे हाता ।
तानाजि चढूं लागले । सद्भाग्य चढूं लागलें ।
स्वातंत्र्य चढूं लागलें । सांभाळी रे म्लेंच्छा आला ।
आला तानाजी ॥ प्रेमें आजी० ॥ १० ॥

११

एका मागुनि एक मराठा सरसर वरि आला ॥
दहा हजाराबरी रिपु असुनिहि चढविति ते हल्ला ॥ १ ॥
कोण कोठुनी किती आणखी कसे कुठें लढती ॥
नकळे अंधारीं रिपु अपसांमधिं झुंजुनि पडती ॥ २ ॥
खालीं वरतीं मागें पुढतीं आजू बाजूंनीं ॥
सैरावैरां पळतां पाडिति भाला भोंसकुनी ॥ ३ ॥
**चाल** ॥ तो मर्द मराठा गडी । शत्रुंचि मढीं ।
हजारों पाडी ।
तुडवीत चिखल मांसाचा । पोहूनि पूर रक्ताचा ।
घे मार करित ये साचा । कल्याणाचें दार कडाडे ॥
झाली रे बाजी ! ॥ प्रेमें आजी ॥ ११ ॥

१२

बाजी झाली परि तो आहे कोठें तानाजी ? ॥
मारित छाटित काटित रमला रणरंगामाजीं ॥ १ ॥
उदयभानु तो दिसला धरिला घे घे मार उडे ॥
झुंज झुंजतां नजरा फिरल्या गर्जे सिंह पुढें ॥ २ ॥
" सह्याद्रीच्या वाघा शेळी उदयखान खाशी " ॥
" खान आपुल्या बापा ह्मणत जा मी रजपुतवंशी ॥ ३ ॥
" धिग् धिग् नीचा लाजि न वंशा लाज रजपुतांच्या ! ॥
" श्रीरामाच्या, श्रीकृष्णाच्या, प्रतापसिंहाच्या ! ! ! ॥ ४ ॥
" मुसलमान कां बाप तुझा तूं लढशी आह्मांशीं ॥
" आर्यभूमिला मुक्त कराया जे झटतों त्याशीं ॥ ५ ॥
बोलुनि पुनरपि तुटोनि पडला जरि तो श्रमलेला ॥
उदय भानुचा वार मर्मिंची अवचित तो बसला ॥ ६ ॥
**चाल** ॥ मूर्छना अहा पातली । क्षणा भीतरीं ।
वीररसशाली ।
तानाजी खालीं येतो । हा धैर्य मेरु उन्मळतो ।
शिवकरिंचा भाला गळतो । भूमातेच्या मांडीवरती
पहुडे तानाजी ! ॥ प्रेमें आजी० ॥ १२ ॥

१३

पडतां ताना आणि मराठे बघूनि हटतांना ॥
सूर्याजीची सिंहगर्जना भय देते कर्णी ॥ १ ॥
"अरे चालला कोठें सांगा सर्व मराठे हो ! ॥
"भाला ठेवा भरा बांगड्या मग पुढती जा हो ॥ २ ॥
"बाप मरोनी पडला तेथें तुमचा लढतांना ॥
"पळत जाउनी अवश्य नरकीं ढकला पितरांना ! ॥३॥
"जाउं इच्छितां काय धरोनी आल्या दोराला ? ॥
"अहो षंढ तो दोर मघांची लढोनियां मेला ! ॥ ४ ॥
**चाल** ॥ धिक्कार शब्द ऊठले । पुन्हां उलटले ।
मराठी भाले ।
घनघोर युद्ध चाललें । वीरांसि वीर तो भिडे ।
देशार्थ मराठा लढे । त्यांना घुटके वीररसाचे
स्वतंत्रता पाजी ॥ प्रेमें आजी० ॥ १३ ॥

१४

अहो धरा तो मातृघातकी देशघातकी हो ॥
चला चला रे त्या ठायांला अन्य विषय राहो ॥ १ ॥
सर्व मराठा लोटे तिकडे ध्याया सूडाला ॥
उदयभानु परि अधींच कोणी नरकीं पाठविला ॥ २ ॥

त्याच्या रक्तीं भिजवुनि फडकें केला झेंडा तो ।
स्वातंत्र्याचा विजयध्वज तो अजुनि तिथें झुलतो ॥ ३ ॥

चाल ॥ तानाजिकडे जन वळे । दाटले गळे ।
वाहती जळें ।
तानाजि कांहिंसा उठला । जय पाहुनि 'हरहर' केला ।
"देशार्थ मरें मी वदला"। मागुति पडला—आतां ।
कैंचा उठतो तानाजी ॥ प्रेमें आजी० ॥ १४ ॥

१५

मग त्या गडची भूमी ठेवी तानाजिसि उदरीं ॥
तेव्हांपासुनि रत्नाकर बहु तीचा द्वेष करी ॥ १ ॥
**स्वतंत्रतेच्या रणांत लढतां स्वतंत्रतेसाठीं ॥**
**त्या पक्षाचा कैवारी श्री मुरहर जगजेठी ॥ २ ॥**
देशाला हो धर्माला हो स्वातंत्र्याला हो ॥
बा तानाजी सूर्याजी शिवबापाला हो ! ॥ ३ ॥
धन्य मराठे पुनीत झाले अरिरुधिरस्नानें ॥
आणि 'विनायक' त्यांच्या निर्मल यशस्सुधापानें ॥ ४ ॥
असो समाप्ती छत्रपतींच्या सरस्वतीमाजी ॥
'**गड** आला परि **सिंह** चालला आमुचा **तानाजी**" ! ! !
प्रेमें आजी० ॥ ५ ॥

# श्रीशिवाजीमहाराजांची आरती.

आर्यांच्या देशावरि म्लेंच्छांचा घाला ।
आला आला सावध हो शिव भूपाला ।
सद्गदिता भूमाता दे तुज हांकेला ।
करुणारव भेदुनि तव हृदय न कां गेला ।
जयदेव जयदेव जय श्रीशिवराया ।
या या अनन्य शरणा आर्यां ताराया ॥
जयदेव० ॥ धृ० ॥

२

श्रीजगदंबा जीस्तव शुंभादिक भक्षी ।
दशमुख मर्दुनि जी श्री रघुविर संरक्षी ॥
ती पूता भूमाता म्लेच्छांहीं छळितां ।
तुजविण तिज शिवराया कोण दुजा त्राता ॥
जयदेव जयदेव० ॥

३

त्रस्त आह्मी दीन आह्मी शरण तुला आलों ।
परवशतेच्या पाशीं मरणोन्मुख झालों ।
साधुपरित्राणाया दुष्कृति नाशाया ।
भगवन् भगवद्गीता सार्थ कराया या ।
जयदेव जयदेव० ॥

४

ऐकुनिया आर्यांचा धांवा महिवरला ।
करुणोक्तें स्वर्गीं श्रीशिवनृप गहिंवरला ।
देशास्तव शिवनेरीं घेई देहाला ।
देशास्तव रायगडीं ठेवी देहाला ।
देशस्वातंत्र्याचा दाता जो झाला ।
बोला तत्श्रीमच्छिवनृप कीं जय बोला ।
जयदेव जयदेव० ॥

# विहारी.

साप्ताहिक वर्तमानपत्र. प्रत्येक सोमवारीं नियमित प्रसिद्ध होत असतें. यांत राजकीय, धार्मिक, सामाजिक वगैरे चालू विषयांवर निर्भिड, सणसणीत लेख येत असतात. महाराष्ट्रांतील विद्वानांचे उत्तम अभिप्राय आले आहेत. काळकर्ते लिहितातः—'यांतील लेख निर्भिड व सत्यास धरून लिहिलेले असतात. शेवटीं अशाच विचारांचा जय व्हावयाचा.' वार्षिक वर्गणी ट. ह. सह १।८।३. कोणत्याही महिन्याचे पहिले तारखेपासून सुरू करितां येतें.

फाटक ब्रदर्स, बुकसेलर्स,
ठाकुरद्वार-मुंबई.

कर्नाटक प्रेस, मुंबई.